॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळे अंतर्गत शिक्षणशास्त्र विभागात आज दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर सर्व उपस्थित विद्यार्थी-शिक्षकांनी एकजुटीने संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून वचनबद्धता व्यक्त केली.

कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून डॉ. संतोष खराडे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, त्यातील मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये तसेच संवैधानिक मूल्यांची आजच्या काळातील उपयुक्तता याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुण्या प्राचार्य डॉ. जयश्री नेमाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे प्रेरणादायी विश्लेषण करताना त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संविधाननिर्मितीतील योगदानाची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांनी विशेषतः महिलांसाठी डॉ. आंबेडकरांनी केलेल्या कार्याचा उल्लेख करताना स्त्री-पुरुष समानतेवरील त्यांची भूमिका, महिलांना दिलेले हक्क, शिक्षणाच्या संधी, संपत्तीवरील अधिकार, विवाह आणि घटस्फोटातील न्याय्य तरतुदी तसेच स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार यांचा इतिहास उलगडून सांगितला.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करतांना डॉ. मनिषा इंदानी यांनी विद्यार्थ्यांनी लोकतांत्रिक मूल्यांचा अंगीकार करून जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले. यासोबतच त्यांनी संविधानामधील समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या चार मूलभूत स्तंभांचे महत्त्व विशद केले. समाजातील विविधतेचा आदर राखत सर्वांनी परस्पर सहकार्याने काम करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

कार्यक्रमाच्या समारोपा प्रसंगी २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील सर्व हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या साहस, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचे स्मरण करण्यात आले. दोन मिनिटे मौन पाळून उपस्थितांनी त्यांना विनम्र अभिवादन केले.

या प्रसंगी शिक्षणशास्त्र विभागातील डॉ. स्वाती तायडे, डॉ. रणजित पारधे, श्री. योगेश कोरडेवाड हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या विभागातील शिक्षकेत्तर कर्मचारी जयेश पाटील, विवेक भावसार तसेच विभागातील सर्व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे साहित्य सृजन या  भित्तीपत्रिकेचे विमोचन ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी व प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु.पगारे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी डॉ. वाणी यांनी विविध समाजसुधारकांच्या माहीतीच्या भित्तीपत्रिकां मधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो असे सांगितले प्रा. म.सु. पगारे यांनी साहित्य सृजन भित्तीपत्रक हे प्रशाळेचा आरसा असल्याचे सांगून याद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्जनाची क्रिया त्यांच्या मेंदूतून सातत्याने आविष्कृत होत रहावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी प्रशाळेतील अध्यापक डॉ.सुदर्शन भवरे, डॉ.प्रिती सोनी, डॉ. दीपक खरात, कृष्णा संदानशीव, प्रतिभा गलवाडे, प्रिती मनुचारी, नेहा लामणे, पल्लवी बारी, महेश सुर्यवंशी, रामकिसन गायकवाड, रेखा साळी व विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ — दिनांक: २६ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

जळगाव (प्रतिनिधी) दि. २६ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेचे संचालक प्रा. डॉ. अजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागात संविधान दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. उमेश गोगडीया हे उपस्थित होते तर डॉ. प्रशांत सोनवणे यांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी भारतीय राज्यघटनेच्या प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले असून डॉ. जगन्नाथ सावंत यांनी प्रस्ताविकेचे प्रभावी सादरीकरण केले. त्यानंतर 26/11 मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवान व निरपराध नागरिकांना उपस्थित मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली.

संविधान दिनानिमित्त आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दलची जागरूकता वाढविण्यास, संवैधानिक मूल्यांविषयी आदर निर्माण करण्यास आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दृढ करण्याच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. मोईन शेख यांनी केले. यावेळी प्रशाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २६ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता